# गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर

पो. कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर.

## ❖ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❖

(फक्त सभासदांकरिता)

जा.क्र. ५०/३१४/२०२५-२०२६ दि. १५/०७/२०२५

प्रती,

मा.श्री./श्रीमती/मे. ____________________

आपले गौतम सहकारी बँक लि., गौतमनगरची सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाची ५० वी **"वार्षिक सर्वसाधारण सभा" शनिवार दि. २/०८/२०२५ रोजी दुपारी २.०० वा. बँकेचे विद्यमान चेअरमन मा.श्री. संजय कारभारी आगवन** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी मु.पो. गौतमनगर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर येथे बँकेच्या मुख्यकार्यालयातील **जनरल मिटींग हॉल / सभागृहामध्ये** होणार आहे. तरी आपण या सभेत उपस्थित रहावे, हि विनंती.

### ❖ सभेपुढील विषय ❖

**विषय नं. १** दिनांक १७/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

**विषय नं. २** दिनांक ३१/०३/ २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचुन त्यास मंजुरी देणे.

**विषय नं. ३** दिनांक ३१/०३/२०२५ अखेर बँकेचा ताळेबंद पत्रक व सन २०२४- २५ या कालावधीतील नफा-तोटा पत्रकाची नोंद घेऊन त्यास मंजुरी देणे

**विषय नं. ४** सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन त्याची नोंद घेणे व सदर अहवालाचा दोष-दुरुस्ती पुर्तता अहवालाची नोंद घेऊन स्विकृत करणे.

**विषय नं. ५** मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

**विषय नं. ६** मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२५-२०२६ सालाकरीता खर्चाचे व उत्पन्नाचे अंदाज पत्रकास मान्यता देणे तसेच सन २०२४-२०२५ सालच्या अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

**विषय नं. ७** सन २०२५-२०२६ या वर्षाकरीता वैधानिक लेखापरीक्षणासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयास शिफारस करुन मंजुरी मिळाल्यानंतर सनदी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना शासकीय नियमानुसार देण्यास मान्यता देणे.

**विषय नं. ८** बँकेच्या मा.संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७५ (२) नुसार आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये येणे बाकी कर्जाची माहीती घेणे.

**विषय नं ९** मा संचालक मंडळास बाहेरील निधी उभारणीचे अधिकार देणे.

**विषय नं. १०** बँकेच्या संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीस मंजुरी देणे.

**विषय नं ११** मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या वार्षीक विकास आराखडयानुसार सन २०२४-२०२५ मध्ये केलेल्या कामकाजाच्या आढाव्याची नोंद घेणे.

**विषय नं १२** सभासदांना बँकींग शिक्षण व प्रशिक्षण देण्याबाबत निर्णय घेणे.

**विषय नं १३** वैधानिक लेखापरीक्षकांनी बुडीत या वर्गवारित प्रमाणित केलेल्या अनुउत्पादित कर्ज खात्याची नावें बाकी वसुलीचा अग्रहक्क आबाधित ठेऊन सदर खाती निर्लेखिकरण करणे बाबत मंजुरी देणे.

**विषय नं १४** सन २०२४-२५ मध्ये एक रक्कमी कर्ज परत फेड योजना अंतर्गत तडजोड केलेल्या कर्ज खात्यांस मान्यता देणे.

**विषय नं १५** सदर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करून मान्यता देणे

**विषय नं.१६** मा. अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने आयत्या वेळी आलेल्या विषयांवर विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार,
**श्री. प्रविण संतोष पावडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर.

स्थळ - गौतमनगर
दिनांक - १५।०७।२०२५

---

टीप -

१) गणसंख्या अभावी सभा तहकुब झाल्यास हि सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्धा तास वाट पाहून सभेस सुरुवात केली जाईल त्यास कोरमची आवश्यकता नाही.

२) अहवालाची प्रत बँकेच्या मुख्य कार्यालय व सर्व शाखा कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच बँकेच्या संकेतस्थळ www.gautambank.com वर सुद्धा उपलब्ध आहे.

३) वरील वार्षिक सर्वसाधारण सभेत होणाऱ्या विषयांसंबंधी काही सुचना करावयाच्या असल्यास किंवा प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांना सुचना किंवा लेखी स्वरुपात बँकेच्या मुख्य कार्यालयात सभेच्या तारखेपुर्वी आठ दिवस अगोदर पोहचतील अशा रितीने पाठवावे.

४) सभेचे कामकाज संपल्यानंतर सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे. त्याचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा.

५) ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत आपले भाग दाखले घेतले नसतील, त्यांनी बँकेमध्ये समक्ष येवून घेऊन जावे.

६) सर्व सन्मा. सभासदांना विनंती की, आपला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी बँकेकडे नोंद करावी म्हणजे यापुढे बँकेला डिजीटल नोटीस आपणांस पाठविता येईल.

७) रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सभासदांनी / खातेदारांनी आपली के.वाय.सी. पुर्तता त्वरीत पुर्ण करावी.

मागे पहा...

# ❖ पोटनियम दुरुस्ती ❖

## परिशिष्ट अ

| उपविधी (पोटनियम) क्रमांक | सध्याची पोटनियम शब्द रचना | दुरुस्ती करावयाची शब्द योजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| २ | ■ नोंदणीकृत कार्यालय -<br>१. बँकेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय गौतमनगर, पोष्ट कोळपेवाडी ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर - ४२३६०२ या पत्तावर असेल.<br>२. वरील पत्यामध्ये कोणताही बदल करावयाचा झाल्यास स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिद्धी देऊन सदर पोटनियमाची महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० मध्ये दिलेल्या पध्दतीनुसार दुरूस्ती करावी लागेल व त्यास रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीयाची पुर्व परवानगी घ्यावी लागेल. | ■ नोंदणीकृत कार्यालय -<br>१. बँकेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय गौतमनगर पोष्ट कोळपेवाडी ता. कोपरगांव - ४२३६०२ जि. अहिल्यानगर या पत्तावर असेल.<br>२. वरील पत्यामध्ये कोणताही बदल करावयाचा झाल्यास स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिद्धी देऊन सदर पोटनियमाची महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० मध्ये दिलेल्या पध्दतीनुसार दुरूस्ती करावी लागेल व त्यास रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीयाची पुर्व परवानगी घ्यावी लागेल. | दि.०४/१०/२०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र जारी केलेल्यानुसार जिल्हयांचे नावात बदल केल्यामुळे |
| ३ | ■ कार्यक्षेत्र -<br>बँकेचे कार्यक्षेत्र हे अहमदनगर, पुणे, नाशिक, ठाणे, आणि औरगांबाद हे जिल्हे यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास त्यास रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया व नोंदणी अधिकारी / निबधंक यांची आवश्यकतेनुसार लेखी पुर्व परवानगी घेण्यात येईल. | ■ कार्यक्षेत्र -<br>बँकेचे कार्यक्षेत्र हे संपुर्ण महाराष्ट राज्य असेल. यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास त्यास रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया व नोंदणी अधिकारी / निबधंक यांची आवश्यकतेनुसार लेखी पुर्व परवानगी घेण्यात येईल. | बँकींग व्यवसाय वाढीच्या दृष्टीने |
| ८ | ■ भाग भांडवल -<br>बँकेचे अधिकृत भाग भांडवल रू. १०,००,००,०००.०० (अक्षरी रूपये दहा कोटी मात्र) इतके असुन ते रू.२५/- दर्शनी किंमतीच्या ४०,००,०००.०० इतक्या भागात विभागलेले असेल. | ■ भाग भांडवल -<br>बँकेचे अधिकृत भाग भांडवल रू. २५,००,००,०००.०० (अक्षरी रूपये पंचविस कोटी मात्र) इतके असुन ते रू.२५/- दर्शनी किंमतीच्या १,००,००,०००.०० इतक्या भागात विभागलेले असेल. | बँकेचा वाढता कारभार व बँकेचे सध्याचे वसुल भाग भांडवल पाहाता भाग भांडवल मर्यादा वाढविणे आवश्यक आहे. |

प्रति, बुक-पोस्ट

मे श्री/श्रीमती ____________________

मु.पो. ____________________ ता. ____________________

जि. ____________________

पाठविणार

**चेअरमन,**

**गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर**

पो. कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर. पिन ४२३ ६०२